बोलणे

आपल्या कुठल्याही नात्यात एखादा क्षण असा येतो की सगळ्या केलेल्यावर पाणी ओतले जाते, नकळत काही बोलण्याने कटुता येते, मनातील एखादी सल काहीश्या वेगळ्या धारेत बोलली जाते, खर तर अशी सल शक्यतो कुठे तरी कोपऱ्यात मनाच्या मागे लपवून टाकावी, सल उघडी पडली की नात्यातील साल ओरबडली जाते, आपण एखादा धनादेश/चेक मिळाल्यावर कसे त्याच्या मागे काही संदर्भ लिहितो, मजकूर लिहितो, त्याने तो चेक/ धनादेश खराब होत नाही, पण तेच संदर्भ चेक वर समोर लिहिले तर त्याची शून्यात गणना होते, असंच काहीसं मनाचं असावं, काही गोष्टी मागच्या पानावर लिहून ठेवून नात्यातील प्रेमाचा, आनंदाचा खजिना वटवून घ्यावा.

सपु
www.saarthbodh.com